# महाराष्ट्र दुय्यम सेवा, गट-ब (अराजपत्रित) (पूर्व) व (मुख्य) स्पर्धा परीक्षा
# Maharashtra Subordinate Services, Gr. B
# (Non-Gazetted) (Pre) & (Main) Competitive Exam

**परीक्षेचे टप्पे :- १. संयुक्त पूर्व परीक्षा – १०० गुण**
**२. मुख्य परीक्षा - ४०० गुण** (पेपर क्र.-१ संयुक्त व पेपर क्र.२ स्वतंत्र)

## महाराष्ट्र दुय्यम सेवा, गट-ब (अराजपत्रित) संयुक्त (पूर्व) परीक्षा.
## Maharashtra Subordinate Service, Gr.-B. (Non-Gazetted) Combined (Pre) Exam

## -:परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकेची संख्या - एक.**

| विषय व संकेतांक | प्रश्नसंख्या | एकुण गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य क्षमता चाचणी (संकेतांक क्र. ०१२) | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

## -: अभ्यासक्रम :-

| अनु. क्र. | विषय |
|---|---|
| **सामान्य क्षमता चाचणी** | |
| १) | **चालु घडामोडी** - जागतिक तसेच भारतातील. |
| २) | **नागरिकशास्त्र** - भारताच्या घटनेचा प्राथमिक अभ्यास, राज्य व्यवस्थापन (प्रशासन) ग्राम व्यवस्थापन (प्रशासन). |
| ३) | **इतिहास** -आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास. |
| ४) | **भूगोल** (महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह) - पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नद्या, उद्योगधंदे, इत्यादी. |
| ५) | **अर्थव्यवस्था** —<br>**भारतीय अर्थव्यवस्था** - राष्ट्रीय उत्पन्न, शेती, उद्योग, परकीय व्यापार, बँकिंग, लोकसंख्या, दारिद्रय व बेरोजगारी, मुद्रा आणि राजकोषीय नीति, इत्यादी.<br>**शासकीय अर्थव्यवस्था** - अर्थसंकल्प, लेखा, लेखापरीक्षण, इत्यादी. |
| ६) | **सामान्य विज्ञान** - भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry), प्राणिशास्त्र (Zoology), वनस्पतीशास्त्र (Botany), आरोग्यशास्त्र (Hygiene). |
| ७) | **बुध्दिमापन चाचणी व अंकगणित**<br>**बुध्दिमापन चाचणी** — उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न<br>**अंकगणित** — बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश, अपूर्णांक व टक्केवारी. |

**टीप** — सदर मुख्य परीक्षेची सुधारित परीक्षा योजना वर्ष २०२० च्या होणाऱ्या परीक्षा पासून लागू राहील.

**दिनांक - ०४/०३/२०२०**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

www.MPSC360.com

# सहायक कक्ष अधिकारी, गट - ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा
# Assistant Section Officer, Gr.-B (Non-gazetted) Main Exam

## -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन** **एकूण गुण — ४००** **पेपर क्र.-१ (संयुक्त पेपर) -२०० गुण**

**पेपर क्र.-२ (स्वतंत्र पेपर) -२०० गुण**

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | गुण | प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ (संकेतांक ०१४) | मराठी | १०० | ५० | मराठी - बारावी | मराठी | एक तास |
| | इंग्रजी | ६० | ३० | इंग्रजी - पदवी | इंग्रजी | |
| | सामान्य ज्ञान | ४० | २० | पदवी | मराठी -इंग्रजी | |
| २ (संकेतांक ५०३) | सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान | २०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास |

## अभ्यासक्रम

**पेपर क्रमांक - १ - मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अनु.क्र. | विषय |
|---|---|
| १. | **मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्यप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २. | **इंग्रजी : -** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |
| ३. | **सामान्य ज्ञान** |
| | **१. चालू घडामोडी** - जागतिक तसेच भारतातील. |
| | **२. माहिती अधिकार अधिनियम, २००५ व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५** |
| | **३. संगणक व माहिती तंत्रज्ञान** - आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळया क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नवीन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळ्या सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी, माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न व त्याचे भवितव्य. |

**पेपर क्रमांक -२.........**

**पेपर क्रमांक -२ - सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अनु.क्र. | विषय |
|---|---|
| १. | **बुध्दिमत्ता चाचणी** |
| २. | **महाराष्ट्राचा इतिहास** - सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम / भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी. |
| ३. | **महाराष्ट्राचा भूगोल** - महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान (Climate), पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल - लोकसंख्या (Population), migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परीणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्टया व त्यांचे प्रश्न. |
| ४. | **भारतीय राज्यघटना** - घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे - शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ - Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या. |
| ५. | **राजकीय यंत्रणा** (शासनाची रचना अधिकार व कार्ये) **केंद्र सरकार, केंद्रिय विधिमंडळ आणि राज्य सरकार व प्रशासन** (महाराष्ट्राचा विशेष संदर्भ). |
| ६. | **जिल्हा प्रशासन, ग्रामीण आणि नागरी स्थानिक शासन** |
| ७. | **न्यायमंडळ** - न्यायमंडळाची रचना, एकात्मीक न्यायमंडळ - कार्ये, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाची भूमिका व अधिकार, दुय्यम न्यायालये - लोकपाल, लोकायुक्त आणि लोक न्यायालय सांविधानिक आदेशाचे रक्षण करणारे न्यायमंडळ, न्यायालयीन सक्रियता, जनहित याचिका. |
| ८. | **नियोजन** - प्रक्रिया, प्रकार, भारताच्या पहिल्या ते दहाव्या पंचवार्षिक योजनेचा आढावा, मुल्यांकन, सामाजिक व आर्थिक विकासाचे निर्देशफलक, राज्य आणि स्थानिक पातळीवरील नियोजन, विकेंद्रीकरण, ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती, भारतीय अर्थव्यवस्था, क्षेत्रीय विकासाचा कल व सेवा क्षेत्राची रुपरेषा, भारतीय अर्थव्यवस्थेच्या समोरील आव्हाने, गरीबी, बेरोजगारी आणि प्रादेशिक असमतोल. |

**दिनांक - ०४/०३/२०२०**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

www.MPSC360.com